FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

0154224

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे ला.प्र.वि. मुंबई Police Station, पहिली खबर क्र. २६ FIR No, वर्ष २०२२ Year, दिनांक २६/०३/२०२२ Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधिनियम १९८८ कलमे Sections ८
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना Occurrence of offence: वार Day मंगळवार, तारीख पासून Date from ०८/०३/२०२२, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to २६/०३/२०२२, वेळ Time २३:१५

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P.S.: तारीख Date ........ वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference Entry No. १२२, तारीख Date २६/३/२०२२, वेळ Time २३:१५

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी — लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence: (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल कांदिवली (प) मुंबई - ४००१०३; वार्ड Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist ........, राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant Permanent Address.

   (a) नाव Name श्री.निर्दोषकुमार पै
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री.रामचंद्र पै
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ६५ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ९९२३३२६९०३ / ७०८३६९८३३८
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........
   (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिन्दू, जात Caste ब्राम्हण, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address ........ गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary)

   मिलींदकुमार सिताराम संखे, वय ५४ वर्षे, नोकरी-मेडीकल रेकॉर्ड टेक्निशियन (वर्ग-3) रा. डी. एम. व्ही. प्लाझा, मनवेल पाडा रोड, बी/५०३ रिलायन्स मॉलच्या समोर, विरार (पुर्व) ता- वसई, जि- पालघर

फिर्यादि म्हटि. निर्दोषकुमार रामचंद्र पै यांची फिर्याद हि स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केली असून, तीच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

रविरनाथ माने
पोलिस निरीक्षक
लाप्रवि. मुंबई

फिर्याद दिनांक :— १६/०३/२०२२

श्री. निर्दोषकुमार रामचंद्र पै, वय ६५ वर्षे, धंदा — फायनान्स, रा.ठि. जी—२, शामसदन, ९३, एस.व्हि. रोड, खार (प), मुंबई ५२, आधार कार्ड क्र.— ९६०० ७७६० २७९२, मो.क्र. ९९२३३२६९०३, ७०८३६१८३३८

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्यावर माझे कुटुंबासह मागील तीन वर्षापासून वास्तव्यास असून त्यापुर्वी मी सी — ११०, अल्टीस मनोर, करंझालीम, गोवा येथे मी करीत असलेल्या हाऊसिंग लोन, पर्सनल लोन, टु / फोर व्हिलर लोन फायनान्स माझे व्यवसायानिमित्ताने राहत होतो. माझे इतर सर्व कुटुंबिय मुंबई येथे वास्तव्यास असून माझी पत्नी स्टेट बॅंक ऑफ इंडिया, एलएचओ., बी.के.सी, मुंबई येथे नोकरी करत आहे. त्यामुळे मी वर नमुद केलेप्रमाणे पत्यावर माहे ऑक्टांबर २०१९ पासून माझा गोवा येथील व्यवसाय बंद करुन पत्नी व मुलासमवेत राहत आहे.

मी गोवा येथे व्यवसायानिमित्ताने रहावयास असताना माझा लहान भाऊ नामे श्री. रविंद्र रामचंद्र पै हे मनोरुग्ण असल्याने त्यांचेवर प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथ उपचार सुरु होते. तेथून त्यांची प्रकृती सुधारल्याने त्यांना दिनांक १८/०६/२००९ मध्ये रुग्णालयातून घरी सोडण्यात आले होते. परंतु रविंद्र यांच्याकडे लक्ष देण्यास कोणीही नसल्याने त्यांना स्वागत आश्रम, सेंट अॅंथनी चर्चच्या मागे, मालाड (प), मुंबई येथील धर्मादाय संस्थेमध्ये ठेवण्यात आले होते. सदर ठिकाणी आमच्याकडुन मासिक देखभाल खर्च देण्यात येत होता. सदर कालावधीत रविंद्र विविध आजाराने ग्रस्त होते. याच आजारामुळे रविंद्र यांची प्रकृती बिघडल्याने त्यास स्वागत आश्रम संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी १८/०३/२०१४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई येथे आंतररुग्ण म्हणून दाखल केले होते. सदर ठिकाणी उपचार घेत असताना दिनांक २७/०४/२०१४ रोजी त्यांचे निधन झाले. सदरबाबत स्वागत आश्रम संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आम्हा कुटुंबियांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु आमचेशी संपर्क न झाल्याने त्यांच्या अंतिम क्रियाकर्माकरीता आम्हा कुटुंबियांपैकी कोणीही उपस्थित राहू शकलो नव्हंतो. परंतु सदरवेळी आश्रमामधील पदाधिकाऱ्यांकडून भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई येथून प्राप्त मृत्यूच्या कारणाचे प्रमाणपत्र आमच्या मित्रांपैकी मिलींद काणे यांचेकडे हस्तांतरीत केले होते. आम्ही मुंबई येथे आल्यानंतर त्यांनी सदरचे मृत्यूच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणपत्र आमच्याकडे हस्तातरीत केले.

आमचे दिवंगत वडील श्री रामचंद पै हे त्यावेळी राहत असलेले २/५२, एम.आय.जी. कॉलनी, सिध्दार्थ नगर, रोड नं. २, गोरेगाव (प), मुंबई ४००१०४ येथील सिध्दार्थ नगर, तपस्या एमआयजी टेनामेन्टस सह. गृह. संस्था मर्यादीत येथील पदाधिकारी यांचेकडून सदर सदनिकेचे एकूण रु. ९२,९१६/— थकीत असल्याचे पत्र दिनांक ०६/०९/२०१८ रोजी आम्हाला प्राप्त झाले होते. त्यावेळीदेखील आम्ही आमच्या कामात व्यस्त असल्याने सदर पत्राकडे आमच्याकडून दुर्लक्ष झाले. त्यावेळी सोसायटीकडून दिनांक ०४/१०/२०१८ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले. दरम्यानच्या काळात कोविड — १९ संक्रमणामुळे सोसायटीची थकीत रक्कम भरणा करण्याकरीता आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्याची प्रक्रिया स्थगित झाली होती. मागील दोन महिन्यांपासून मी नमुद सोसायटीच्या थकबाकीची रक्कम भरणा करण्यासंबंधाने आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव सुरु केली. त्यावेळी माझेकडे माझे दिवंगत आई वडिलांच्या मृत्यू प्रमाणपत्रांची प्रत उपलब्ध होंती. तसेच दिवंगत रविंद्र यांच्या मृत्यूच्या कारणाचे प्रमाणपत्राची प्रत आमचेकडे होती. सदर मृत्युच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणपत्र घेवून मी मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता कांदिवली येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बोरीवली (प), मुंबई येथील कार्यालयात गेलो असता आमच्या भावाच्या नावामध्ये चुक झाल्याची बाब आमच्या निदर्शनास आणून देण्यात आली. तसेच रविंद्र हे भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई येथे उपचार घेत असताना मयत झाल्याने सदर ठिकाणी जाण्याबाबत सांगितले.

त्यामुळे सदर चुकीची दुरुस्ती करण्याकरीता दिनांक ०८/०३/२०२२ रोजी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई येथे सिनियर सुपरिंटेंडट, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई यांचे नावाने दिवंगत भावाच्या मृत्यूच्या कारणाच्या प्रमाणपत्रामध्ये नावामध्ये झालेली चुकीची दुरुस्ती करण्याकरीता लेखी निवेदन पत्र घेवून गेलो असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी सदर

निवदेन पत्रावर स्वाक्षरी करुन वैद्यकीय रेकॉर्ड टेक्नेशियन श्री. संखे यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी वैद्यकीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीचा लेखी अर्ज घेवून श्री. संखे यांना भेटलो असता त्यांनी मला सदर कामासाठी रु. ५,०००/– खर्च येईल व पैसे दिल्यानंतर सात दिवसांनी तुमचे काम होईल असे सांगितले. त्यावर मी श्री. संखे यांना नावामध्ये झालेली चुकीची दुरुस्ती करण्याकरीता मागणी केलेले रु. ५,०००/– हे कायदेशीर भरणा करावे लागतील किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला पैसे दिले नाहीत तर काम होणार नाही असे सांगून काम करायचे असल्यास पैसे द्यावे लागतील असे सांगितले.

परंतु भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, मुंबई येथील श्री. संखे यांनी मागणी केलेप्रमाणे रु. ५,०००/– रक्कम त्यांना देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक १५/०३/२०२२ रोजी सबंधित वैद्यकीय रेकॉर्ड टेक्नेशियन श्री. संखे यांच्या विरुध्द तक्रार देणेकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे आलो. मला ला.प्र.वि कार्यालयातील वरिष्ठांसमक्ष उभे करण्यात आले व माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. माने साहेब यांची नेमणूक करण्यात आली. पोलीस निरीक्षक माने साहेब यांनी माझेकडे माझे तक्रारीबाबत सविस्तर चौकशी करुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई येथील वैद्यकीय रेकॉर्ड टेक्नेशियन श्री. संखे यांचेविरुध्द असलेल्या तक्रारीबाबत लेखी अर्ज लिहून देण्यास सांगितल्याने. मी माझी तक्रार अर्ज मराठी भाषेत लिहून दिला. पो.नि. माने साहेबांनी मला दिनांक १६/०३/२०२२ रोजी सकाळी १०:०० वाजता ला.प्र.वि., मुंबई विभाग, वरळी, मुंबई येथील कार्यालयात हजर राहण्यास सांगितले.

पो.नि. माने साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक १६/०३/२०२२ रोजी ला.प्र.वि., मुंबई विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयात सकाळी १०:०० वाजता हजर झालो. पो.नि. माने साहेब यांचे कक्षात त्यांचेसोबत उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, पोलीस निरीक्षक लांघी साहेब यांचेशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर पो.नि. माने यांनी उपस्थित पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत समजावून सांगून मी दिनाक १५/०३/२०२२ रोजी दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. माने यांच्या सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही शासकीय पंचांनी स्वाक्षरी करुन व त्यानंतर पो.नि. माने यांनी स्वत: स्वाक्षरी करुन तक्रार अर्ज स्वत:च्या ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि. माने साहेबांनी पडताळणीकरीता आवश्यक बाबींची पुर्तता करुन मी, पो.नि. लांघी, पो.नि. माने, दोन शासकीय पंच व पोलीस पथक असे दोन शासकीय वाहनाने ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयातून बाहेर पडून अमर रेसिडेंस सोसायटी, कांदिवली (प) समोरील रस्त्यालगत व दुसरी गाडी कांदिवली स्टेशन (प), मुंबई येथे उभ्या केल्या. त्यानंतर पो.नि. लांघी साहेब व पो.नि. माने साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीबाबतच्या सुचना देवून श्री. संखे यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजिटल रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाचे आतील बाजूस बनियानला लावून पंच श्री. अभिमन्यू लकडे यांचेसोबत जाण्यास सांगितल्याने मी व पंच पायी पायी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई येथील तळमजल्यावरील श्री. संखे यांच्या कार्यालयात जावून श्री.संखे यांची भेट घेतली. त्यावेळी मी श्री. संखे यांना मृत्यू प्रमाणपत्रामध्ये रविंद्र पै यांचे नाव नमुद केले किंवा कसे, याबाबत विचारणा करुन यापुढे काय करावयाचे बाबत चौकशी केली असता श्री.संखे यांनी मृत्यूचे कारणाचे प्रमाणपत्रामध्ये दुरुस्ती करण्यात आली असून सदरचे प्रमाणपत्र घेवून बी. एम.सी. कार्यालय, कांदिवली (प), मुंबई येथे जावून काम करुन घेण्यास सांगितले. त्यानंतर मी श्री. संखे यांनी माझेकडे कामाकरीता मागणी केलेले रूपये ५,००० आणले आहेत का असे विचारले. तेव्हा मी त्यांना रूपये ५,००० जास्त होतात. थोडे पैसे कमी करा अशी विनंती केली. तेव्हा त्यांना मला रूपये ४,००० घेउन येण्यास सांगितले. मी त्यांना एटिएम मध्ये जावुन पैसे घेवून यावे लागतील असे सांगितले. त्यावेळेस श्री. संखे यांनी एटिएम कांदिवली स्टेशन जवळ असून तेथूनच त्यांचेकडील मृत्यूच्या नावामध्ये दुरुस्ती करुन देणेबाबतच्या मुळ पत्र माझेकडे देउन त्याची छायांकीत प्रत घेवून येण्याबाबत सांगितले.

मी व पंच श्री. लकडे असे पोलीस वाहन उभे असलेल्या ठिकाणी आलो. तेथे आल्यानंतर पो.नि. माने व पो.नि. लांघी यांनी श्री. संखे व आमचेत झालेले संभाषण ऐकले व सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला व पंच श्री. अभिमन्यू लकडे यांना आवश्यक त्या सुचना देवून माझेकडे मी सोबत आणलेल्या लाचेच्या रकमेबाबत चौकशी केली. तेव्हा मी माझेकडील एकुण रू. ४,०००/– ( त्यामध्ये रू. ५००/– दराच्या ८ चलनी नोटा ) पो.नि. माने साहेबांकडे दिल्या. त्यानंतर मला व पंचाना अँथ्रासिन पावडर बाबत माहिती देवून सदर नोटांना

अॅथ्रासिन पाऊडर लावून त्याबाबतचे गुणधर्म समजावून सांगून, सदर नोटा माझे नेसणीस असलेल्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवण्यात आल्या व श्री. संखे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डोंळयावरील चष्मा काढून रुमालाने पुसण्याचा इशारा करण्याबाबत सांगीतले. तसेच पोलीस पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने आजूबाजूस थांबून इशारा मिळताच श्री. संखे यांना ताब्यात घेतील असे सांगितले. त्यानंतर पो.नि. माने यांनी माझे शर्टाचे आतील बाजूस बनियानला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावला. त्यानंतर मी व पंच श्री. लकडे असे पुन्हा पायी लोकसेवक श्री. संखे यांचे कार्यालयात रवाना झालो.

मी व पंच श्री. लकडे असे श्री. संखे यांच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई यांच्या रजिस्ट्रेशन कार्यालयाजवळ गेलो तेव्हा श्री. संखे हे त्यांच्या कार्यालयाच्या दालनाबाहेर येवून शेजारी असलेल्या रिकाम्या जागेसमोर थांबले होते. तेथे जाताच त्यांनी माझेकडील मृत्यू नाव बदली करणेबाबत प्रमाणपत्राची मुळ व छायांकीत प्रत ताब्यात घेतली, दुय्यम प्रतीवर माझी मुळ प्रत प्राप्त झालेबाबत स्वाक्षरी घेतली. व हाताने पैसे देण्याबाबत सांगुन त्यांचें मागे येण्यास सांगीतले. तेथील रिकाम्या दालनात नेवून तेथून माझेकडील रु. ४,०००/- घेवून ते त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिशामध्ये ठेवले. त्यानंतर मी बाहेर येउन पोलीस पथकाकडे श्री. संखे यांनी पैसे स्विकारले बाबत पुर्वनियोजित इशारा करताच पोलीसांनी श्री. मिलिंदकुमार संखे यांना त्यांच्या कार्यालयात ताब्यात घेवून त्यांनी माझेकडून स्विकारलेली लाचेची रक्कम पंचासमक्ष त्यांचे डाव्या खिशातून ताब्यात घेतली.

दिनांक ०८/०३/२०२२ रोजी माझ्या मृत भावाच्या नावामध्ये मृत्यूच्या कारणाच्या प्रमाणपत्रामध्ये झालेली चुकीची दुरुस्ती करण्याकरीता रु. ५,०००/- इतकी लाचेची मागणी केली आणि दिनांक १६/०३/२०२२ रोजी तडजोडीअंती रूपये ४,००० स्विकारण्याचे कबुल केले. दिनांक १६/०३/२०२२ रोजी लोकसेवक श्री. मिलिंदकुमार सिताराम संखे यांनी माझेकडून लाचेची रक्कम रूपये ४,००० स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरूध्द फिर्याद आहे.

या पूर्वी मी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली (प), मुंबई येथील वैद्यकीय रेकॉर्ड टेक्नेशियन श्री. मिलिंदकुमार सिताराम संखे यांचेशी माझा कोणताही वाद नसुन त्यांचेशी मी कोणतेही प्रकारचे आर्थिक व्यवहार केलेले नाहीत.

माझी फिर्याद संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहीली, ती माझे सागणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( मिलिंद माने )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..................

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता. वे. व ठिकाणी "फि" यांच्या भावास उपचाराकरीता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल, कांदिवली (प) मु. येथे दाखल करण्यात आले होते. परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला होता. मयत भावाचे मृत्यूच्या कारणाचे प्रमाणपत्र घेण्यासाठी "फि" हे हास्पिटल येथे गेले असता प्रमाणपत्रात भावाच्या नावात चूक असल्याचे "फि" याना आढळून आले सदर नावात बदल करण्यासाठी आलोसे यांनी "फि" यांना रु. ५०००/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ४०००/- अशी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दि. ३६/०३/२०२२ रोजी केलेल्या सापळा कारवाईत दरम्यान यातील आलोसे याना "फि" याचेकडून रु. ४०००/- रकमेची लाच स्विकरताना रंगेहात पकडण्यात आले म्हणुन भ्र.प्र. अधि. १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली** कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमांप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलिस निरीक्षक - विरनाथ माने

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन.................., जिल्हा.................., राज्य..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank.................. No.................. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................. (3) Transferred to P. S. ..................
District.................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name विरनाथ माने
पदनाम Rank पोलिस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..................
Posting
Code No. of I. O. ..................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer 5. Off...